महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुर्नवसन
Tel.No. : (020)26124815
: (020)26127906
Email ID : igoffice.ddo-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११००१.**

**वाचा:-** **१.** वित्त विभाग शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम दि.०१.०३.२०२४.
**२.** शासन गृह विभाग निर्णय क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था १ दि.०२.०८.२०२४
**३.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.१६.०९.२०२४.

जा.क्र.लेखा/घबांअ/२०२४-२५/कक्ष-५, पुणे ०१ 9004 दिनांक:- 25 /१०/२०२४

## // आदेश //

**विषय:- घरबांधणी अग्रिम/घर खरेदीसाठी अग्रिम वित्तीय वर्ष २०२४-२५**

**१.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.०२.०८.२०२४ रोजीच्या पत्रानुसार सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी घरबांधणी अग्रिम करिता **रुपये-१२,२८,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी अठ्ठावीस लक्ष पन्नास हजार फक्त)** इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.१६.०९.२०२४ रोजीच्या पत्रानुसार घरबांधणी अग्रिम करिता **रुपये- ७,६०,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.सात कोटी साठ लाख पन्नास हजार फक्त)** इतके अनुदान खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**२.** वित्तीय नियमावली १९५९, परिशिष्ट २६, नियम १,२, (क) (ड) (फ), ४ (अ) (ड) ६ (क) (६) आणि वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम दि.१७.०४.२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ नुसार घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबत प्रदान केलेल्या अधिकारान्वये सोबत जोडलेल्या यादीतील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर रकाना क्र.०४ मध्ये दर्शविले प्रमाणे घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येत आहे.

**३.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१४/प्र.क्र.४९/कोषा प्र-५ दि.२२.०८.२०१४ नुसार कर्जे व अग्रिमे सेवार्थ प्रणालीद्वारे कोषागार कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या यादीतील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर केलेल्या घरबांधणी अग्रिम रक्कमेनुसार शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार सेवार्थ प्रणालीमध्ये माहिती भरुन मुख्यालयास पाठविण्यात यावी, जेणे करुन संगणक प्रणालीतील आदेश तसेच देयके तयार करता येतील.

**४.** आपले कार्यालयामार्फत सेवार्थ प्रणालीमध्ये अधिकारी/कर्मचारी यांची मुद्दलाची तसेच सेवार्थ प्रणालीने गणना केलेल्या व्याजाच्या वसुलीचे हप्ते ठरविताना शासन निर्णय दि.०१.०३.२०२४ अ.क्र.०३ मध्ये नमूद केल्यानुसार सेवानिवृत्तीची तारीख, अग्रिम परतफेडीची क्षमता इ. बाबी विचारात घेवून मुद्दलाचे व व्याजाचे वसुलीचे हफ्ते भरण्यात यावेत.

**५.** सदर माहिती उक्त शासन निर्णय दि.२२.०८.२०१४ अनुक्रमांक ०८ नुसार सेवार्थ प्रणालीमध्ये भरुन संगणक प्रणालीद्वारे घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यास सक्षम अधिकारी यांचा सेवार्थ आयडी ***IGPSVSF8301 / (SHRUTI BHUSHAN KULKARNI) / 2201000475*** वर मुख्यालयास सादर करण्यात यावी व भरलेल्या माहितीप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची नावे, हफ्त्याची रक्कम, व्याजाची रक्कम व हफ्त्यांची संख्या इ.तपशिलवार माहिती पत्राद्वारे देखील मुख्यालयास कळविण्यात यावी.

६. सदर माहिती मुख्यालयास पाठविण्यापूर्वी कार्यालय प्रमुखांनी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वित्त विभाग शासन निर्णय दि.०१.०३.२०२४ मधील परिच्छेद क्र.०९ मध्ये नमूद केलेनुसार संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे.

७. सोबत जोडलेल्या यादीतील अधिकारी/कर्मचारी यांची घरबांधणी अग्रिमाबाबतची माहिती सेवार्थ प्रणालीद्वारे भरावयाची असल्याने जे अधिकारी/कर्मचारी यांची बदली इतर कारागृहात झाली असेल त्यांची नस्ती बदली झालेल्या कार्यालयास प्राधान्याने तात्काळ पाठविण्यात यावी.

८. या पत्रासोबत सर्वसाधारण महत्वाच्या सूचना प्रपत्र अ जोडण्यात आले आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**९. सदरचे अनुदान सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावे व संबंधीतांना रक्कम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक न चूकता मुख्यालयास सादर करण्यात यावा.**

**१०. अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांकासह संबंधीतांच्या सेवापुस्तकात न चुकता नोंद घेण्यात यावी.**

**(मा.अ.पो.म.सं.(का.) यांचे मान्यतेने)**

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

**प्रति,**

**लेखा व अधिदान अधिकारी,**
लेखा व अधिदान कार्यालय, बांद्रा मुंबई
**कोषागार अधिकारी,**
ठाणे/पुणे/सोलापूर/सांगली/लातूर/छ.संभाजीनगर/नांदेड/पैठण/नंदूरबार/
उपकोषागार अधिकारी,पनवेल जि रायगड

**प्रत:- पुढील कार्यवाहीस्तव**
मा.कारागृह उपहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे
प्राचार्य, दोलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय पुणे
अधीक्षक मध्यवर्ती कारागृह:- मुंबई/ तळोजा /ठाणे/ येरवडा/छ.संभाजीनगर/
अधीक्षक, जिल्हा कारागृह:- भायखळा/मुंबई जिल्हा महिला कारागृह/सोलापूर/सांगली/नांदेड/
लातूर/नंदूरबार/पैठण खुले जिल्हा कारागृह
कक्ष अधिकारी कक्ष क्र.०१ (आस्थापना)/०५(लेखा)विभाग, अ.पो. म. सं.व का.म.नि.,महाराष्ट्र राज्य पुणे

**प्रत:- माहितीसाठी सादर**
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह),/मध्य विभाग औरंगाबाद/नाशिक विभाग, नाशिक.
कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई

**मागास/अमागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमा चा पहिला हफ्ता/ एकरकमी अनुदान वाटपची यादी सन २०२४-२५**

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम व कार्यालयाचे नाव सर्वश्री | मंजूर अग्रिम रक्कम | मंजूर केलेली रक्कम | मुद्दल अग्रिम/व्याज वसुलीचे हफ्ते व दरमहा वसुली |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| | **चतुर्थश्रेणी कर्मचारी** | | | |
| ०१. | श्रीमती विद्या अनिल निकुंभ शिपाई अ पो म सं व का म नि कार्या पुणे | ७९५००० | **एकरकमी ७९५०००** | मुद्दल रु.१०६०० X ७५ हफ्ते व व्याज रक्कम रु.१,९८,८८३/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| | **मागासवर्गीय कर्मचारी** | | | |
| ०१. | सुमित दिलीप वेताळ, कारागृह शिपाई<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | १४४०००० | **एकरकमी १४४००००** | मुद्दल रु.९६०० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.७,१५,७४०/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०२. | अमित राघु तोंडे,<br>कारागृह शिपाई<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | २०५४००० | **एकरकमी २०५४०००** | मुद्दल रु.१३७०० चे १४९ हफ्ते व रु.१२७०० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.१०,०७,८९२- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०३. | वर्षा बाबुराव इंगळे वानखेडे<br>कार्यालयीन अधीक्षक<br>तळोजा मध्यवर्ती कारागृह | ४३४२००० | **एकरकमी ४३४२०००** | मुद्दल रु.४३४२० X १०० हफ्ते व व्याज रक्कम रु.१६,२६,२६०/- मुद्दल संपल्यावर ३६ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०४. | मधुगोंड तुकाराम जाधव, कारागृह शिपाई<br>मुंबई मध्यवर्ती कारागृह | १६५०००० | **एकरकमी १६५००००** | मुद्दल रु.११००० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.८,२०,११९/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०५. | अरविंद प्रकाश नागोठणेकर,<br>चर्मकला निदेशक<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | १३३२००० | **एकरकमी १३३२०००** | मुद्दल रु.१३३२० X १०० हफ्ते व व्याज रक्कम रु.४,४२,८३५/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०६. | संजय गुलाबराव राठोड, हवालदार<br>नांदेड जिल्हा कारागृह | ३०००००० | **पहिला हफ्ता ९०००००** | मुद्दल रु.२५००० X १२० हफ्ते व व्याज रक्कम रु.१३,४६,१२५/- मुद्दल संपल्यावर ३६ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०७. | अरुण एकनाथ साळी, कारागृह शिपाई<br>छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | ३१५७००० | **पहिला हफ्ता ९४७१००** | मुद्दल रु.३१५७० X १०० हफ्ते व व्याज रक्कम रु.११,८२,४२८/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०८. | श्रीमती जयश्री जानकीराम जव्हार, लिपीक<br>नांदेड जिल्हा कारागृह | ३१५०००० | **पहिला हफ्ता ९४५०००** | मुद्दल रु.२१००० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.१७,६३,८६९/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०९. | अशोक मारुती लोकरे, कारागृह शिपाई लातूर जिल्हा कारागृह | ३८००००० | **पहिला हफ्ता ११४००००** | मुद्दल रु.३०४०० X १२५ हफ्ते व व्याज रक्कम रु.१७,७५,५५०/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १०. | बद्रीनाथ रवननाथ लटपटे, कारागृह शिपाई कारागृह उपमहानिरीक्षणालय पश्चिम विभाग पुणे | २४९५००० | **पहिला हफ्ता ७४८५००** | मुद्दल रु.२४९५० X १०० हफ्ते व व्याज रक्कम रु.८,२९,४८४/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ११. | श्रीमती अंजली विश्वास पसरटे, वरिष्ठ लिपीक छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | २९४९००० | **एकरकमी २९४९०००** | मुद्दल रु.२४५७५ X १२० हफ्ते व व्याज रक्कम रु.१३,२३,२४१/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १२. | अशु जयदेव पाटील, कारागृह शिपाई<br>ठाणे मध्यवर्ती कारागृह | २०००००० | **एकरकमी २००००००** | मुद्दल रु.१६००० X १२५ हफ्ते व व्याज रक्कम रु.८,२९,५००/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १३. | केशरसिंग हिरालाल दुल्हत, कारागृह शिपाई<br>पैठण खुले कारागृह | १८००००० | **एकरकमी १८०००००** | मुद्दल रु.१४४०० X १२५ हफ्ते व व्याज रक्कम रु.७,४६,५५०/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१४.** | दत्ता पाटीलबा कायंदे, कारागृह शिपाई छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | १७४०००० | **एकरकमी** **१७४००००** | मुद्दल रु.१३९२० X १२५ हफ्ते व व्याज रक्कम रु.७,२१,६६५/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **१५.** | कल्याणसिंग धनसिंग सुलाणे, कारागृह शिपाई छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | २२००००० | **पहिला हफ्ता** **६६००००** | मुद्दल रु.२५००० X ८८ हफ्ते व व्याज रक्कम रु.६,४४,५०८/- मुद्दल संपल्यावर ३६ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **१६.** | ज्ञानेश्वर विष्णु खाडे, हवालदार दौ जा तु अ प्र महा पुणे | १३००००० | **एकरकमी** **१३०००००** | मुद्दल रु.२६००० X ५० हफ्ते व व्याज रक्कम रु.२,१८,२३८/- मुद्दल संपल्यावर १८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **१७.** | शोएब जाकीर खाटिक, कारागृह शिपाई नंदूरबार जिल्हा कारागृह | ३६००००० | **पहिला हफ्ता** **१०८००००** | मुद्दल रु.२४००० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.२०,१५,८५०/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| | **अमागासवर्गीय कर्मचारी** | | | |
| **१८.** | विजय तुकाराम फोलाने, कारागृह शिपाई छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | ४०००००० | **पहिला हफ्ता** **१२०००००** | मुद्दल रु.४२१०० चे ९४ हफ्ते व रु.४२६०० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.१३,९४,१५९- मुद्दल संपल्यावर २४ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **१९.** | श्रीमती संतोषी सयाजी कोळेकर तुरुंगाधिकारी श्रेणी २ मुंबई जिल्हा महिला कारागृह | १८७२००० | **एकरकमी** **१८७२०००** | मुद्दल रु.२०८०० X ९० हफ्ते व व्याज रक्कम रु.५,६०,७४२/- मुद्दल संपल्यावर ३६ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२०.** | हनुमान संपत चांदर कारागृह शिपाई छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | १९५०००० | **एकरकमी** **१९५००००** | मुद्दल रु.१३००० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.९,६९,२३१/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२१.** | विलास श्रीमंत घाडगे शिपाई सोलापूर जिल्हा कारागृह | २२६५००० | **एकरकमी** **२२६५०००** | मुद्दल रु.१५१०० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.११,२५,७९९/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२२.** | सुभाष सौदागर ढवळे शिपाई भायखळा जिल्हा कारागृह | ३५००००० | **एकरकमी** **३५०००००** | मुद्दल रु.२१८७५ X १६० हफ्ते व व्याज रक्कम रु.२०,८९,६४६/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२३.** | अनिल बाळासाहेब गायकवाड कार्यालयीन अधीक्षक अ पो म सं व का म नि कार्या | २०००००० | **एकरकमी** **२००००००** | मुद्दल रु.४०००० X ५० हफ्ते व व्याज रक्कम रु.३,३५,७५०/- मुद्दल संपल्यावर १८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे तसेच शिल्लक रक्कम सेवा व उपदान रक्कमेतून वसूल करण्यात यावी. |
| **२४.** | हणमंतराव साहेबराव लोकरे तुरुंगाधिकारी श्रेणी ०१ येरवडा मध्यवर्ती कारागृह | ५५००००० | **पहिला हफ्ता** **१६५००००** | मुद्दल रु.३४३७५ X १६० हफ्ते व व्याज रक्कम रु.३२,८३,७२९/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२५.** | तुकाराम हणमंत मिसाळ शिपाई सांगली जिल्हा कारागृह | ४२३९००० | **पहिला हफ्ता** **१२७१७००** | मुद्दल रु.२८२६० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.२३,७३,६६३/- मुद्दल संपल्यावर ३६ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| **२६.** | अफजल शकील शेख वरिष्ठ लिपीक येरवडा मध्यवर्ती कारागृह | २८५०००० | **एकरकमी** **२८५००००** | मुद्दल रु.१९००० X १५० हफ्ते व व्याज रक्कम रु.१५,९५,८८१/- मुद्दल संपल्यावर ४८ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| | **(अक्षरी रक्कम रु .चार कोटी त्रेसष्ट लक्ष एक्यांएंशी हजार तीनशे फक्त)** | | **एकूण** **४६३८१३००** | |

**Personal Assistant to**
**Inspector General of Prisons**
**Maharashtra State, Pune-1.**

# प्रपत्र-अ

## -:सर्वसाधारण महत्वाच्या सूचना:-

**१.** या अग्रिमाकरिता होणारा खर्च ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, २०१ घरबांधणी अग्रिम मागणी क्रमांक बी-११ गौणशिर्ष २०१ (७६१०००८७), वित्त विभाग या अर्थसंकल्पात लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये खर्ची टाकण्यात येत आहे.

**२.** ज्या अधिका-यांना/कर्मचा-यांना त्यांच्या नवीन घराच्या बांधकामासाठी किंवा तयार घराच्या खरेदीसाठी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे परतफेडीसाठी अग्रिम मंजूर करण्यात आलेले आहे, त्यांनी सदर अग्रिमाची रक्कम संबंधीत वित्तीय संस्थेस प्रदान करुन त्यांच्या पावती व वित्तीय संस्थेकडे केलेले गहाण खत रद्द करुन शासनाकडे गहाण ठेवण्यासाठी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविलेले विहीत नमुना बी-४ मधील गहाण खत कार्यालय प्रमुखांनी तीन महिन्याच्या आत संबंधीतांकडून प्राप्त करुन घ्यावे. वित्तीय संस्थेस परत करावयाची शिल्लक असलेली रक्कम मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा कमी असल्यास फरकाची रक्कम शासनास त्वरीत परत करावी लागेल.

**३.** ज्या अधिका-यास/कर्मचा-यास नवीन/जुने तयार घर खरेदीकरिता किंवा वित्तीय संस्थेच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्यात आलेले आहे, त्यांनी मुंबई वित्तीय नियमावली, १९५९ परिशिष्ट २६ मधील विहीत नमुना बी (४) मध्ये दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी केलेले गहाणखत कार्यालय प्रमुख यांनी तीन महिन्याच्या आत संबंधीतांकडून प्राप्त करुन घ्यावे. तसेच ज्या कर्मचा-यांना घराचे विस्तारित बांधकाम करण्यासाठी मंजूर केले आहे त्यांनी नमुना बी-३ मध्ये दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविलेले गहाणखत कार्यालय प्रमुखाकडे सादर करावे. तसेच वैयक्तिक बंधपत्र/जामीनखत इत्यादी कागदपत्रे घेण्यात यावी.

**४.** ज्या अधिका-यांना/कर्मचा-यांना अग्रिमाचा पहिला हफ्ता मंजूर करण्यात आला आहे त्यांचेबाबत प्लिंथ लेव्हल पर्यंत घराचे बांधकाम झाल्यानंतर मंजूर करावयाच्या अग्रिमाच्या ४० टक्के आणि रुफ लेव्हल पर्यंत बांधकाम झाल्यानंतर उर्वरित ३० टक्के इतक्या रक्कमेचे प्रदान करण्यात येईल. तथापि झालेल्या बांधकामाबाबत मान्यता प्राप्त वास्तुविशारद अथवा सिव्हील इंजिनिअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५.** ज्या अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केले आहे त्या कारणाकरिता त्याचा विनीयोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम, प्रचलित व्याजदर अधिक २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

**६.** मुंबई वित्तीय नियमावली १९५९ च्या नियम १५ अन्वये विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे घराचा विमा उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहिल याची दक्षता घ्यावी. अन्य विमा कंपन्यांकडून घराचा विमा उतरविल्यास तो मान्य करण्यात येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**७.** वित्त विभाग, शासन निर्णय दि.०१.०३.२०२४ मधील परिच्छेद १२ मध्ये नमूद केलेनुसार घरबांधणी अग्रिम रक्कमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहिल.

**८.** शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम दि.०१.०३.२०२४ नुसार रु.२४.९९ लक्ष पर्यंतच्या घरबांधणी अग्रिमाच्या व्याजाची परिगणना ७.९०% या दराने करावी व रु.२५.०० लक्ष ते रु.६९.९९ लक्ष पर्यंतच्या घरबांधणी अग्रिमाच्या व्याजाची परिगणना ८.९०% या दराने करावी. रु.७०.०० लक्ष ते रु.०१ कोटी पर्यंतच्या मंजूर अग्रिमाच्या बाबतीत संपूर्ण मंजूर अग्रिम रक्कमेवर व्याजाची परिगणना ९.९०% या एकरुप दराने करावी.

**९.** मुंबई वित्तीय नियमावली १९५९, परिशिष्ट २६ मधील नियम १४ चा उपनियम अ,ब,क,ड आणि इ अन्वये आदेशातील संबंधीत कर्मचा-यांच्या मुद्दल अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम/ अग्रिमाचा प्रथम हफ्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात यावी. अग्रिम वसुलीत खंड पडल्यास शासनाने निर्धारित केलेल्या दंडनीय व्याज दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल.

**१०.** अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबींची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी व तसे मुख्यालयास कळविण्यात यावे.

**११.** आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा सुरु असल्यास तसेच त्यांना शासकीय सेवेतून निलंबित अथवा कमी करण्यात आले असल्यास त्वरीत मुख्यालयाचे निर्देशनास आणावे.

**१२.** ज्या महिन्यामध्ये संपूर्ण मुद्दलाची परतफेड होईल त्या महिन्यानंतर लगेच येणा-या महिन्यापासून परिशिष्ट २६ नियम १४ च्या उपनियम फ प्रमाणे व्याजाची रक्कम जास्तीत जास्त ४८ हफ्त्यात किंवा कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी वसूल होईल या दृष्टीने वसुली करावी. त्याप्रमाणे वसुली न केल्यास अथवा व्याजाच्या वसुलीत खंड पडल्यास शासनाने निर्धारित केलेल्या दंडनिय व्याज दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल. **वसुल करावयाची रक्कम शिल्लक राहिल्यास ती रक्कम अधिकारी/कर्मचारी यांच्या मृत्यू नि सेवा उपदानातून एक रकमी वसुल करावी. तद्नंतरच ना देय प्रमाणपत्र द्यावे.**

**१३.** अग्रिमाच्या मुद्दलाची वसुली प्रधान शिर्ष ७६१० शासकीय कर्मचा-यांना कर्जे इत्यादी, घरबांधणीसाठी आगाऊ रक्कम, २०१ सांकेतिक क्रमांक ७६१०५०१५०० या शिर्षाखाली व व्याजाची रक्कम ००४९ व्याजाच्या जमा रकमा, ८०० इतर जमा रकमा, सांकेतिक क्रमांक ००४९-००६-१०० (४४) (१) या शिर्षाखाली जमा करण्यात याव्यात. चलनावर वरीलप्रमाणे पूर्ण अर्थसंकल्पीय शिर्ष स्पष्टपणे नोंदविलेले असावे. तसेच संगणक सांकेतांक लिहिण्यास विसरु नये.

**१४.** मुद्दल व व्याजाच्या रकमा निरनिराळ्या चलनाने भराव्यात. मूळ कर्ज किती व कोणत्या तारखेला घेतले तसेच त्याबाबतचा प्रमाणक क्रमांक व दिनांक आणि कर्ज कोणत्या कारणासाठी दिलेले आहे याचाही तपशिल चलनावर स्पष्ट लिहावा.

**१५.** अधिकारी/ कर्मचारी यांची सध्याच्या कार्यालयातून बदली झाल्यास अग्रिमाच्या पुढील वसुलीकरिता त्याचा तपशील अंतिम वेतन प्रमाणपत्रावर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. जेणेकरुन अग्रिमाची वसूली वेळेवर व अचूकरित्या होऊ शकेल. तसेच अग्रिमाच्या वसुलीची माहिती अग्रिम वसुली विवरणपत्रकात पाठविण्याविषयी नवीन कार्यालयास सूचित करण्यात यावे.

**१६.** अग्रिम घेणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेची ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखाकडून तत्परतेने पडताळणी करुन घ्यावी. एकदा मुद्दलाची परतफेड केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असलेल्या व्याजाची वसुली लांबणीवर टाकण्यात येवू नये. व्याजाची परिगणना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४४/९९/विनियम दि.०५ मे २००० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.

**१७.** जे अधिकारी/कर्मचारी घरबांधणी अग्रिमावरील व्याज वसुलीच्या अगोदर सेवानिवृत्त होत असतील अशा अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर देय होणा-या लाभांमधून घरबांधणी अग्रिम व्याजाची वसुली करण्यात यावी.

वरील अधिकारी/कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखांनी अग्रिमाची वसुली दरमहा नियमितपणे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून करावी आणि त्याचा हिशोब ठेवावा. अग्रिम रक्कमेवरील व्याजाची वसुली निर्धारित दराप्रमाणे करणे आणि थकबाकीबाबत संबंधीतांना सूचना देणे, **अग्रिम अदा करणेसाठी व अग्रिम अदा केल्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे विहीत कालावधीत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन दफ्तरी जतन करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहिल याची कृपया नोंद घ्यावी.** संबंधीत अर्जदारास अग्रिम मंजूरीच्या वेळी याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात. अन्यथा सदर प्रकरणी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रीम १०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६ सप्टेंबर १९९७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.